सत्यमेव जयते
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे- ४११००१**
Website: trti.maharashtra.gov.in दुरध्वनी- ०२०-२६३३०८५४

## अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून एमपीएससी - महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२५ तयारीकरीता प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य (सानुग्रह) योजना

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीचे जे उमेदवार महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झाले आहेत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत मुख्य परीक्षेच्या तयारीकरीता प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य (सानुग्रह) प्रदान करण्यात येणार आहे.

- **योजनेचे स्वरूप**

  पात्र अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु. १५,०००/- आर्थिक सहाय्य (सानुग्रह) दिले जाईल.

- **पात्रता**

  १. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जमातीचा असावा.
  २. उमेदवाराकडे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जमात वैधता प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.
  ३. शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारास ह्या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
  ४. सन २०२५-२६ करीता या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेकरीता अंतिम निवड झालेल्या उमेदवार सदर योजनेस अपात्र ठरतील.
  ५. सन २०२५-२६ मध्ये एमपीएससी राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा व वनसेवा यापैकी कुठल्याही परीक्षेकरीता प्रोत्साहनपर आर्थिक सहाय योजनेचा लाभ घेतलेला उमेदवार सदर योजनेस अपात्र ठरतील.
  ६. उमेदवाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये आठ लाखापेक्षा कमी असावे.
  ७. उमेदवार दि. १५/०४/२०२६ रोजी जाहीर झालेल्या एमपीएससी - महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेला असावा.

- **अर्ज करण्यासाठी**

  १. उमेदवाराने खाली दिलेल्या लिंकवर (गुगल फॉर्म) जाऊन **दि. ०७/०५/२०२६** पूर्वी ऑनलाईन अर्ज भरावा.
  २. या कार्यालयाच्या संकेतस्थळावर https://trti.maharashtra.gov.in/ सदर योजनेकरीता गुगल फॉर्मची लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
  ३. संपूर्ण अर्ज व्यवस्थित व अचूक भरल्याची खात्री केल्यानंतरच उमेदवाराने अर्ज सादर करावा.
  ४. अपूर्ण माहिती भरल्यास अथवा माहिती लपवल्यास, कोणत्याही टप्प्यावर सदर लाभ या कार्यालया मार्फत रद्द करण्यात येईल व आर्थिक सहाय्य (सानुग्रह) ची संपूर्ण रक्कम उमेदवाराकडून वसूल करण्यात येईल.
  ५. उमेदवाराने वेगवेगळी माहिती भरून एकापेक्षा जास्त वेळा अर्ज भरल्यास लाभ रद्द करण्यात येईल.

- **आवश्यक कागदपत्रे**

  ✓ अनुसूचित जमातीचे जमात प्रमाणपत्र
  ✓ अनुसूचित जमातीचे जमात वैधता प्रमाणपत्र
  ✓ रहिवास दाखला (डोमासाईल प्रमाणपत्र)
  ✓ महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२५ चे प्रवेश पत्र
  ✓ आधारकार्ड
  ✓ तहसिलदाराने निर्गमित केलेला वार्षिक उत्पनाचा दाखला (आर्थिक वर्ष सन २०२४-२५)
  ✓ कोणत्याही राष्ट्रीयकृत बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत (बँक खाते फक्त अर्जदाराच्या नावानेच असावे. पालक/नातेवाईक/ मित्र यांच्या बँक खात्याचा तपशील दिल्यास अर्जदाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.)

**सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी स्वरुपात ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे.**

- **अर्ज पाठविण्यासाठीचा पत्ता :**
  आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे २८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,पुणे- ४११००१

- **अधिक माहितीसाठी**: ०२०-२६३३०८५४

स्वा/-

(मंजिरी मनोलकर, भा.प्र.से.)

**आयुक्त,**

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**